देशोन्नती

आप्पास्वामी महाविद्यालयात डिजिटल सेवेचा प्रारंभ

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ आप्पास्वामी शिक्षण संस्थेद्वारा संचालित आप्पास्वामी महाविद्यालय शेंदुरजनाना अढाव येथे विद्यार्थ्यांच्या आर्थिक कामकाजाकरिता डिजिटल सेवेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब काळे यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील प्रवेश फी, परीक्षा फी ,तसेच विद्यार्थ्यांना भरावयाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या फीज साठी विद्यार्थ्यांना सोयीचे व्हावे म्हणून महाविद्यालयाने डिजिटल सेवा प्रारंभ केली आहे. या सेवेद्वारे विद्यार्थ्यांना स्कॅन करून ऑनलाईन पैसे थेट महाविद्यालयाच्या अकाउंटला जमा करता येईल ,तसेच महाविद्यालयातून त्यांना तशी रितसर पावती मिळेल.यासोबतच महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या केंद्रावर सुद्धा डिजिटल सेवा प्रारंभ करण्यात आली आहे.

या डिजिटल सेवेच्या उदघाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आप्पास्वामी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब काळे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.व्ही. मुंडे, प्रशासकीय अधिकारी व माजी प्राचार्य डॉ.एच. आर. तिवारी, प्रोफेसर डॉ.मुंदे ,उपप्राचार्य डॉ.कव्हर , डॉ. सुनिता मनवर,ग्रंथपाल प्रमोद आढाव ,डॉ.ए.आर. बोरकर ,डॉ. वैशाली भिसे ,मुख्य लिपिक सुधीर अढाव, वरिष्ठ लिपिक शंकर काळे, अमोल काळे ,अनिल राठोड , जगदीश आमटे ,राजेश वानखडे ,राजकमल ढगे,व महाविद्यातील विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुंडे यांनी डिजिटल सेवा ही महाविद्यालयाच्या व्यवहारांमध्ये पारदर्शीकता यावी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कशासाठी पैसे ,भरले किती पैसे भरले, आणि कुठल्या तारखेला पैसे भरले हे विद्यार्थी व महाविद्यालयाला समजायला सुलभ होईल. महाविद्यालयाचे अकाउंट सेक्शन पेपरलेस करण्याचा प्रयत्न या निमित्ताने आपण करतो आहोत असे मत व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेबांनी यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या डिजिटल सेवेचा लाभ घ्यावा तसेच माननीय पंतप्रधान मोदी साहेबांनी संपूर्ण भारताला डिजिटलायझेशन करून भ्रष्टाचार मुक्त भारत घडवूया असे आवाहन केले आहे. त्या आव्हानाला आपणही प्रतिसाद द्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

Washim Edition
Dec 9, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com